# प्रकरण चौथे

## सांगली जिल्हा सहकारी बोर्ड लि., सांगली


४.१ स्थापना

४.२ उद्दिष्टे

४.३ सभासद

४.४ व्यवस्थापन

४.५ कार्यक्षेत्र

४.६ कामकाज

४.७ वित्तीय माहिती

४.८ उपसंहार

सहकारी क्षेत्रातील अनेक तज्ञांनी व संशोधकांनी भारतासारख्या विकसनशील देशात सहकारी शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक व महत्वपूर्ण असल्याचे स्पष्ट केले आहे. १९१५ मध्ये मॅकलान कमिटीने कोणत्याही सहकारी संस्थेच्या नोंदणीपूर्वी व नंतर सभासदांना सहकारी तत्वाचे व व्यवहाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यानंतर सहकारी शिक्षणाच्या संदर्भात वेळोवेळी स्थापन झालेल्या मंडळांनी सहकारी शिक्षण पध्दतीत सुधारणा सुचवल्या. त्याचा उल्लेख मागील प्रकरणात केला आहे.

सहकारी संस्थांच्या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक वाढ करण्यासाठी सहकारी प्रबोधन अत्यंत आवश्यक आहे. प्रबोधनाचे हे कार्य महाराष्ट्र राज्य सहकारी संघ सातत्याने करीत आहे.

संघाच्या नियंत्रण मार्गदर्शन व देखरेखीखाली प्रत्यक्ष जिल्हाला जिल्हा सहकारी बोर्ड शिक्षण व प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रचार, प्रसार व प्रसिध्दीचे कामकाज करीत आहे. सांगली जिल्हाकरिता स्वतंत्र जिल्हा सहकारी बोर्ड आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

४.१ <u>स्थापना</u> : <u>सांगली जिल्हा</u>

सहकारी बोर्डाची स्थापना दि. १६-३-१९५० रोजी झाली. स्थापनेच्या वर्षी या बोर्डाचे नाव 'दक्षिण सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह बोर्ड लि., सांगली' असे होते. बोर्डाची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा ५८२, खणभाग, कार्लेकर वाडा, सांगली येथे भरली होती. त्या सभेचे अध्यक्ष मे. भा.बा. पाटील होते तर डी.बी. निकम हे सभासद सचिव होते.

१९५१-५२ सालच्या बोर्डाच्या अहवालानुसार 'दि सातारा जिल्हा सहकारी बोर्डाची' उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.

४.२ उद्दिष्टये :

१) सहकारी चळवळीचा आत्मा जे सहकारी तत्वज्ञान, त्याचा प्रसार व प्रचार करणे.

२) वरील उद्दिष्टानुसार सहकारी शिक्षण, वाङ्.मय, व्याख्याने, परिषदा भरवणे.

३) सहकाराधिष्ठित समाजरचना या अवस्थेपर्यन्त समाजास मार्ग-दर्शन करण्याचे काम करणे.

४) जिल्ह्यातील सहकारी सोसायटयांच्या सभासदांना व सहकारी चळवळीतील कार्यकर्त्यांना सहकारी शिक्षण देणे.

५) सहकारी चळवळीचा प्रचार योग्य व सनदशीर मार्गाने करून चळवळीचा प्रसार चालू ठेवणे.

६) जिल्ह्यातील सहकारी चळवळीची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी विशिष्ट तऱ्हेच्या सहकारी संस्था स्थापन करणे.

७) फिरती वाचनालये उघडणे. सहकार, ग्रामीण सुधारणा व इतर तत्संबंधी विषयांचे साहित्य वाढवणे. निरनिराळ्या विषयावर सुलभ भाषेत नियतकालिके पुस्तिका हस्तपत्रके प्रसिध्द करणे व चालवणे.

८) महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या विभागाने बोर्डाच्या देखरेखीखाली शिक्षण वर्ग चालवणे.

९) चर्चा योग्य तऱ्हेने व्हावी म्हणून सभा भरवणे, परिषदा भरवणे.

१०) सहकारी सोसायटयांच्या हितासाठी सहकारी सेवा संघ निर्माण करणे,

वरील सर्व उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी जरूरीप्रमाणे द्रव्य सहाय्य मिळवणे इत्यादी.

४.३ <u>सभासद</u> :

जिल्हा सहकारी बोर्डाचे सभासदत्व प्रामुख्याने तीन प्रकारचे आहे :

१) जिल्हातील सर्व सहकारी संस्था

२) व्यक्ती सभासद

३) आजीव सभासद.

सभासद खुले आणि ऐच्छिक असते. मात्र जिल्हातील सर्व सहकारी संस्थांनी बोर्डाचे सभासदत्व स्वीकारावे असे संस्थेच्या पोटनियमात सुचविले आहे.

बोर्डाच्या उपनियम २८ (१) प्रमाणे सभासदत्व मिळण्यासाठी लिखित स्वरूपात अर्ज करावा लागतो. व्यवस्थापक मंडळाच्या मिटींगमध्ये सभासदत्व मंजूर होते. सभासदत्व रद्द करण्यासंबंधी खालील तरतुदी आहेत :

१) रजिस्ट्रारच्या परवानगीशिवाय कोणालाही सभासदत्व रद्द करता येत नाही.

२) सभासद मानसिकदृष्टया विकृत असेल तर समासदत्व रद्द करता येते.

३) कामातील गलथानपणा, अयोग्य वर्तणूक (बोर्डाच्या कामकाजासंबंधी) आढळून आल्यास सभासदत्व रद्द केले जाते.

४) दिवाळखोर आणि गुन्हेगार व्यक्तीला सभासदत्व देता येत नाही.

५) नैतिक अध:पतित व्यक्तीला सभासदत्व देता येत नाही.

सभासदाने ३१ जुलैपूर्वी सभासदत्वाची वर्गणी न भरल्यास त्याला त्यासंबंधी नोटिशीद्वारे कळविले जाते, व १ महिन्याच्या मुदतीत सर्व रक्कम भरावी अशी सूचना केली जाते. हे सर्व करूनही सभासदाने जर वर्गणी भरली

नाही तर त्यास मतदानाचा अधिकार प्राप्त होत नाही. तसेच तो बोर्डाच्या निवडणुकीसही उभा राहू शकत नाही. तो सभासद थकबाकीदार होतो व त्याचे सभासदत्व रद्द करणेबाबत विचार केला जातो.

पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकार मंडळाचा एक प्रतिनिधी व राज्य सहकारी संघाचे १ प्रतिनिधी बोर्डाच्या नामनिर्देशित व्यक्ती म्हणून काम पहातात.

१९५१ ते १९९१ या ४० वर्षांत व्यक्ती सभासद, आजीव सभासद व संस्था सभासद यांची संख्या कशी आहे, हे पुढील सारणीवरून स्पष्ट होते.

सारणी क्र. ४.१

सांगली सहकारी बोर्डाची सभासद संख्या

| वर्ष | व्यक्ती सभासद संख्या | संस्था सभासद संख्या | आजीव सभासद संख्या |
|---|---|---|---|
| १९५२ | - | ४१ | - |
| १९५३ | - | ७३ | - |
| १९५४ | - | १६५ | - |
| १९५५ | ११ | १८२ | - |
| १९५६ | ११ | २११ | - |
| १९५७ | ६ | २१३ | - |
| १९५८ | ६ | २१६ | - |
| १९५९ | ६ | २६३ | - |
| १९६० | १० | ३०१ | - |
| १९६१ | १५ | ३२८ | - |
| १९६२ | २७ | ३७९ | - |

सारणी क्र. ४.१ (पुढे चालू...)

| वर्ष | व्यक्ती सभासद संख्या | संस्था सभासद संख्या | आजीव सभासद संख्या |
|---|---|---|---|
| १९६३ | ४६ | ४०५ | - |
| १९६४ | ५२ | ४२२ | - |
| १९६५ | ७२ | ४६५ | - |
| १९६६ | ७२ | ४७२ | ५ |
| १९६७ | ८५ | ४८२ | ५ |
| १९६८ | ८५ | ४८५ | ५ |
| १९६९ | ८५ | ४९० | ५ |
| १९७० | ८५ | ४९६ | ५ |
| १९७१ | ९२ | ५०५ | ५ |
| १९७२ | ९९ | ५१५ | ५ |
| १९७३ | १०० | ५१९ | ५ |
| १९७४ | १०६ | ५२४ | ५ |
| १९७५ | १०९ | ५२७ | ५ |
| १९७६ | १३७ | ५३८ | ५ |
| १९७७ | १३७ | ५४६ | ५ |
| १९७८ | १७० | ५६९ | ५ |
| १९७९ | १७० | ५७० | - |
| १९८० | १७० | ५७० | - |
| १९८१ | १७७ | ५८१ | - |
| १९८२ | १८१ | ५८२ | - |
| १९८३ | १८६ | ५७९ | - |

सारणी क्र. ४.१ (पुढे चालू...)

| वर्ष | व्यक्ती सभासद संस्था | संस्था सभासद संस्था | आजीव सभासद संस्था |
|---|---|---|---|
| १९८४ | १८७ | ५९१ | - |
| १९८५ | १८८ | ५९५ | - |
| १९८६ | १९६ | ५९७ | - |
| १९८७ | २३० | ६०१ | - |
| १९८८ | ११५ | ६०४ | ३३ |
| १९८९ | ८३ | ६०९ | ३३ |
| १९९० | ८३ | ६२२ | ३३ |

आधार : वार्षिक अहवाल : सांगली जिल्हा सहकारी बोर्ड लि., १९५१ ते १९९०.

निष्कर्ष :

मागील सारणीवरून असे दिसून येते की,


१) व्यक्ती सभासदांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. फक्त १९८८-८९ या वर्षी व्यक्ती सभासदांची संख्या घटली आहे.

२) संस्था सभासदांच्या संख्येत मात्र सातत्याने वाढ होत गेलेली दिसून येते कारण राज्य सहकारी संघाने जिल्हातील प्रत्येक प्राथमिक सहकारी संस्था, तालुका स्तरावरील सहकारी संस्था व जिल्हास्तरावरील सहकारी संस्था या सहकारी बोर्डाच्या सभासद असल्याच पाहिजेत अशी उपनियमात तरतूद केली. सहकारी संस्थांच्या वाढीबरोबरच सभासद संस्थाही वाढली व त्या बरोबर बोर्डाच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाची सभासद संख्या
(पंचवार्षिक सरासरी) १९५१ ते १९९०

| वर्ष | व्यक्ती सभासद | संस्था सभासद | आजीव सभासद |
|---|---|---|---|
| १९५१-५६ | ४.४ | १३४.४ | - |
| १९५७-६१ | ८.६ | २६४.२ | - |
| १९६२-६६ | ५३.८ | ४३५.४ | १.० |
| १९६७-७१ | ८६.४ | ४९१.६ | ५. |
| १९७२-७६ | ११०.२ | ५२४.६ | ५ |
| १९७७-८१ | १६४.८ | ५६७.२ | २ |
| १९८२-८६ | १८७.६ | ५९०.८ | - |
| १९८७-९० | १२७.७५ | ६०९ | - |

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाची सभासद संख्या- 1951-90
(पंचवार्षिक सरासरी)
आलेख क्र.-1



३) आजीव सभासदांची संख्या १९६६ ते १९७८ या काळात ०५ होती ती १९८८ ते १९९० अखेर दरवर्षी ३३ झाली आहे.

आजीव सभासदांचे सभासदत्व हयात असते. इमारतीसाठी निधी गोळा करीत असताना ज्यांनी स्वेच्छेने अर्थसहाय्य केले ते सभासद आजीव सभासद झाले आहेत. तसेच सहकाराच्या उन्नतीसाठी प्रेरित होऊन सभासदांनी आजीव सभासदत्व स्वीकारले आहे. उदार देणगीदारांनाही आजीव सभासदत्व मिळाले आहे.

४.४ प्रशासकीय रचना :

अ) चेअरमन -

सर्व प्रशासकीय रचनेचा चेअरमन हा पदाधिकारी म्हणून प्रमुख असतो. त्यांची कार्ये खालीलप्रमाणे आहेत :

१. संचालक मंडळाच्या सहाय्याने वार्षिक सर्वसाधारण सभेत निर्णय घेणे.

२. त्यांची अंमलबजावणी होते आहे की नाही यावर देखरेख ठेवणे.

३. बोर्डाचे कामकाज व्यवस्थित रितीने चालवणे.

ब) सभासद सचिव -

हा व्यवस्थापनातील एक महत्त्वाचा घटक आहे. हा दैनंदिन कामकाजाचा सूत्रधार असतो. किंबहुना तो प्रशासकीय प्रमुख असतो आणि कार्यकारी मंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणारा प्रमुख घटक असतो.

सभासद सचिवांची कार्ये खालीलप्रमाणे आहेत :

१. वित्तीय व्यवस्थापन करणे.

२. जिल्हा सहकारी बोर्डाच्या नियमाप्रमाणे हिशेब पुस्तके, रजिस्टर्स इ. बाबत अचूक पूर्तता करणे. व्यवस्थापक मंडळाच्या सर्व सभासदाबद्दलची योग्य ती नोंद ठेवणे.

३. सभासदांना योग्य त्या सूचना पत्राद्वारे कळविणे.

४. चेअरमन साहेबांच्या परवानगीने महत्वाच्या कागदपत्रावर सह्या करणे.

५. शैक्षणिक कार्यक्रम राबवणे, या अंतर्गत एका वर्षाच्या कालावधीत राज्य सहकारी संघाने ठरविल्याप्रमाणे शैक्षणिक कार्यक्रमांची अंमलबजावणी व पूर्तता करवून घेणे.

६. कार्यकारी मंडळाच्या सभा वेळोवेळी घेणे.

७. वार्षिक व विशेष सर्वसाधारण सभा घेणे.

८. सहकारी प्रशिक्षण निर्देशकांच्या सहाय्याने सहकारी प्रशिक्षण कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम उद्दिष्टांनुसार पूर्ण करणे.

९. या कामी लागणारी मदत, मार्गदर्शन व देखरेख करणे. कार्यक्रमांना भेटी देणे इत्यादी.

क) <u>सहकारी प्रशिक्षण निर्देशक</u> :

सहकारी प्रशिक्षण निर्देशकांची संख्या प्रत्येक जिल्हासाठी ३ पुरूष निदेशक व दोन जिल्हासाठी एक स्त्री निदेशक अशी एकूण ४ आहे.

सहकारी प्रशिक्षण निदेशकांचा कार्यक्रम राज्य सहकारी संघाने आखून दिलेला असतो. (अधिक तपशील प्रकरण पाचमध्ये आहे).

एका वर्षात निर्देशित केलेले कार्यक्रम सर्व निदेशकानी घ्यावेत अशी राज्य सहकारी संघाची सूचना आहे.

जरूरीप्रमाणे कार्यक्रमांची संख्या बदलण्यास बोर्डाच्या संचालक मंडळास अधिकार आहेत. पण त्या बदलेलेल्या शैक्षणिक कार्यक्रमासाठी राज्य सहकारी संघाकडून मंजूरी घ्यावी लागते.

ड) <u>लिपिक</u> - १

इ) <u>शिपाई</u> - २

अशा पध्दतीची व्यवस्थापकीय रचना महाराष्ट्रातील सर्वच जिल्हा सहकारी बोर्डात आढळून येते.

४.५ <u>कार्यक्षेत्र</u> :

संपूर्ण सांगली जिल्हा हे बोर्डाचे कार्यक्षेत्र आहे.

१९९०-९१ च्या राज्य सहकारी संघाच्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्रात जिल्हा सहकारी मंडळे ३० आहेत.

या मंडळाच्या नियंत्रणासाठी महाराष्ट्रात ५ विभागीय सहकारी मंडळे आहेत. महाराष्ट्रात २ प्रशिक्षण महाविद्यालये आहेत. १३ सहकार प्रशिक्षण केंद्रे आहेत. त्याचा उल्लेख परिशिष्ट १ व परिशिष्ट २ मध्ये आहे.

शिवाय भारतात १६ प्रशिक्षण महाविद्यालये आहेत.

सांगली जिल्हा सहकारी मंडळ मर्यादित सहकार भवन, मार्केट यार्ड, सांगली ही संस्था ` पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ, मर्यादित या विभागीय मंडळाच्या नियंत्रणाखाली आहे.

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाचा सर्व सेवक वर्ग राज्य सहकारी संघाचा सेवक वर्ग आहे.

सांगली येथील मा. गुलाबराव पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र ही शाखा महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे यांच्या नियंत्रणाखाली येते.

४.६ <u>बोर्डाचे कामकाज</u> :

बोर्डाचे कामकाज लोकशाही पध्दतीने चालते.

अ) <u>वार्षिक सर्वसाधारण सभा</u> -

सदर सभेमध्ये बोर्डाचे कामकाज व जिल्ह्यातील शिक्षण प्रशिक्षणाच्या कार्यासंबंधी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात येतात. अपेक्षित गणपूर्ती न झाल्यास सभा रद्द होते. ती कमीतकमी ७ दिवसांसाठी रद्द होते.

या सभेस व्यवस्थापक मंडळाचे सभासद, चेअरमन, वित्तपुरवठा करणाऱ्या बँकांचे चेअरमन उपस्थित रहातात. आणि चर्चासत्रात भाग घेतात. व्यवस्थापक मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेस कोणत्याही विशेषज्ञाला सभेला बोलावू शकते. या सभेत बोर्डाचे अंदाजपत्रक, वार्षिक उत्पन्न, खर्च, हिशोब तपासणी, उपनियमासंबंधी चर्चा व मंजुरी, नवीन महत्वाच्या बाबी या संबंधी चर्चा होते.

व्यवस्थापक मंडळाच्या सूचनेनुसार खास सर्वसाधारण सभा एक महिन्यात सेक्रेटरी बोलावू शकतो.

ब) <u>कार्यकारी मंडळाच्या सभा</u> -

या सभा वर्षातून गरजेप्रमाणे ४, ५ प्रसंगी ११ अशा घेण्यात येतात. या सभांना संचालकांची उपस्थिती असते.

जिल्हात पार पाडावयाचे शैक्षणिक कार्यक्रम विविधांगी गरजाधिष्टित व वैशिष्टयपूर्ण होण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण निर्णय या सभेत घेण्यात येतात.

४.७ <u>वित्तीय माहिती</u> :

सहकारी शिक्षण देणारी सांगली जिल्हा सहकारी बोर्ड लि., सांगली ही जिल्हातील मातृसंस्था आहे. ही संस्था पूर्णपणे राज्य सहकारी संघाच्या आर्थिक अनुदानावर अवलंबून आहे. बोर्डाचे उत्पन्न मिळवण्याचे अनेक मार्ग आहेत.

बोर्डाच्या नियम आणि उपनियमामध्ये दर्शविल्याप्रमाणे उत्पन्नाची प्रमुख साधने पुढीलप्रमाणे आहेत.

१. राज्य सहकारी संघाकडून मिळणारे
<u>वार्षिक अनुदान</u> -

हे अनुदान आतापर्यन्त रु. १५,०००-०० वार्षिक होते. १९९१ सप्टेंबरमध्ये ही मर्यादा वार्षिक रु. २२,५००० पर्यन्त वाढवली आहे.

२. <u>समासद वर्गणी</u> -

राज्य सहकारी संघाकडून मिळणाऱ्या अनुदानाप्रमाणेच व्यक्ती समासद, संस्था समासद व आजीव समासदांकडून मिळणारी वर्गणी हा बोर्डाच्या उत्पन्नाचा दुसरा प्रमुख स्त्रोत आहे. वर्गणीचे जुने दर व अलीकडील सुधारित दर यात फरक आहे. समासद वर्गणीचे जुने दर पुढीलप्रमाणे आहेत :

अ) आजीव समासद - वार्षिक वर्गणी रु. ५०-००

ब) व्यक्ती समासद - वार्षिक वर्गणी रु. ५-००

क) संस्था समासदांतर्गत :

१. ग्रामीण स्तरावरील संस्था समासदांना - प्रतिवर्षी रु. ५-००

२. तालुका स्तरावरील संस्थांना - प्रतिवर्षी रु. १०-००

३. जिल्हा स्तरावरील सर्व सहकारी संस्थाना - रु. १५-००

पोट नियम क्र. ५(२) नुसार सुधारित समासद वर्गणीचे दर १९९०-९१ पासून खालीलप्रमाणे निर्धारित केलेले आहेत :

अ) शेतकी पतपेढया - वि.का.स. सोसायटयांना - वार्षिक रु.२०

ब) औद्योगिक मजूर सहकारी संस्था - रु. २०-००

क) इतर प्रकारच्या सहकारी संस्था - रु. २०-००

क) नागरी बँका व तालुका कार्यक्षेत्रात असणाऱ्या संस्था - रु.५०-००

ड) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी साखरकारखाने, सूत गिरण्या व इतर जिल्हा कार्यक्षेत्रात असणाऱ्या सहकारी संस्था - रु. १००-००

इ) सहकारी प्रक्रिया संस्था - रु. २०-००

ई) सर्वसाधारण व्यक्ती समासद - रु. १५-००

उ) आजीव समासद - रु. १५०-००

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सभासदांच्या वाढीबरोबर ही वर्गणी प्रतिवर्षी वाढत गेली आहे. सन १९८८-८९ व १९९०-९१ या वर्षी व्यक्ती सभासदांची संख्या निम्म्याहून कमी झाली आहे. त्यामुळे त्यांच्याकडून मिळणा-या वर्गणीचे प्रमाण घटले असले तरी आजीव सभासद व संस्था सभासद यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे वर्गणीत वाढ व पर्यायाने उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. (सारणी क्र. ३ पहा) संस्था सभासदांकडून जमलेल्या वर्गणीच्या १२$\frac{१}{२}$ टक्के किंवा रू. २००-०० यापेक्षा जी रक्कम कमी असेल, ती पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळाकडून बोर्डाला मिळते.

३. <u>शिक्षण फंड</u> -

प्रत्येक सहकारी संस्थेला बोर्डाकडे शिक्षण फंड जमा करावा लागतो.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे सुधारित कलम ६८ व नियम ५३ प्रमाणे असलेल्या तरतुदीनुसार सहकारी संस्थांनी शिक्षण निधीची रक्कम सहकारी वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत भरणा करावी अशी तरतूद आहे. शिक्षण निधीची बाकी मुदतीत भरणा न केल्यास ती जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीस पात्र रहाते. अशी सुधारित अट कलम ६८ (३) मध्ये नमूद केली आहे.

सहकारी संस्थांनी शिक्षण फंड केंव्हा काढावा ? या संबंधीची माहिती खालीलप्रमाणे आहे :

जर -

१. सोसायटीस एकूण रू. २००-०० पेक्षा अधिक निव्वळ नफा झाला असेल तर.

२. संस्थेने ४ टक्के पेक्षा जास्त डिव्हिडंट वाटप केले असेल तर, निव्वळ नफ्याचे १ टक्का शिक्षण फंड द्यावा लागतो.

३) ४ टक्क्यांपेक्षा अधिक व ५ टक्क्यांपेक्षा कमी दराने डिव्हिडंट वाटप केल्यास दीड टक्का दराने शिक्षण फंड द्यावा लागतो.

४) ५ टक्क्यांपेक्षा जास्त व ६ टक्क्यांपेक्षा कमी या दराने डिव्हिडंट वाटप केल्यास दीड टक्का दराने शिक्षणफंड द्यावा लागतो.

५) ६ टक्क्यांपेक्षा जास्त व ७ टक्क्यांपेक्षा कमी या दराने डिव्हिडंट वाटप केल्यास निव्वळ नफ्याच्या १$\frac{3}{4}$ टक्के दराने शिक्षणफंड द्यावा लागतो.

६) ७ टक्क्यांहून अधिक व ८ टक्केपेक्षा कमी डिव्हिडंट वाटल्यास निव्वळ नफ्याच्या २ टक्के शिक्षणफंड द्यावा लागतो.

७) ८ टक्केपेक्षा अधिक डिव्हिडंट वाटल्यास २$\frac{1}{4}$ टक्के शिक्षण फंड द्यावा लागतो.

वसूल शिक्षण फंडापासून मिळणारे सर्व उत्पन्न राज्य सहकारी संघाकडे वर्ग होते.

४) <u>वर्गणी</u> :

सहकारी चळवळीसंबंधी उपयुक्त व अद्यायावत माहिती मिळणेसाठी सहकारी, महाराष्ट्र व सहकारी जगत या मासिकांच्या वर्गणीपासून उत्पन्न मिळते.

५) <u>वक्तृत्व स्पर्धा शुल्क</u> :

वक्तृत्व व इतर स्पर्धेसाठी असणारे प्रवेश शुल्क हेही बोर्डाचे उत्पन्नाचे साधन आहे. १९८० ते १९९० या काळातच या उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते.

६) <u>बँक व्याज</u> :

बोर्डाचे बँकेतील चालू खात्यावर जे व्याज मिळते ते बोर्डाचे उत्पन्न म्हणून जमा होते.

७) <u>किरकोळ उत्पन्न</u> :

रद्दी वगैरे पासून मिळणारे उत्पन्न.

८) <u>सहकारी कार्यकर्ता परिषद अनुदान</u> :

रू. २,०००.

९) <u>शैक्षणिक आर्थिक सहाय्य</u> :

१०) <u>बोर्ड अहवाल जाहिरातीचे उत्पन्न</u> :

११) परिसंवाद, साहित्य पुस्तिके जाहिरातीपासून मिळणारे उत्पन्न

१२) सांगली जिल्हा सहकारी मुद्रणालयाचे शेअर्स खरेदीवर मिळणारा डिव्हिडंट

१३) शिबिरे, वक्तृत्व स्पर्धा यासाठी रू. ३०००-०० वार्षिक अनुदान राज्य सहकारी संघाकडून मिळते. त्यापैकी रू. ३००-०० स्टेशनरीसाठी प्रत्येक कार्यक्रमाला मिळतात.

सचिव उजळणी वर्ग, युवक शिबीरे, युवक मेळावे यासाठी राज्य सहकारी संघ स्टेशनरी अनुदान देत नाही.

१४) समाजातील कल्याणकारी संस्था, ट्रस्ट अशासारख्या संस्थाकडून शैक्षणिक आर्थिक सहाय्य मिळवण्याचा प्रयत्नही केला जातो.

१५) समाजातील आर्थिकदृष्टया सधन व सहकारप्रेमी व्यक्तींकडून देणग्या मिळवण्याचा प्रयत्न केला जातो.

१६) ध्वज विक्रीपासून बोर्डाला उत्पन्न मिळाले.

वरील उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये कसकसे बदल होत गेले याची माहिती सारणी क्र. ४.२ मध्ये दिली आहे. त्यावरून असे दिसते की, बोर्डाच्या उत्पन्नात सातत्याने वाढ होत आहे.

बोर्डाच्या अहवालातील तरतुदीनुसार त्याच्या खर्चाच्या बाबीमध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

१) समासदांना सूचना पाठवणे, बोर्डाचे सर्व व्यवस्थापकीय कागदपत्रे कार्यक्रमांचा अहवाल, मिटींग इत्यादीसाठी बराच पैसा अलिकडे खर्ची पडतो.

२) समासद वर्गणी हिस्सा - एकूण वसूल वर्गणीच्या $\frac{१}{४}$ किंवा रू. ३०० यातील कमी रक्कम असेल तेवढी रक्कम प.म. प्रादेशिक सहकारी मंडळास वसूल समासद वर्गणी पाठवावी लागते.

३) शैक्षणिक कार्यक्रम व इतर ऑफिशियल कामकाज यासाठी बराच टेलिफोन खर्च येतो.

४) बोर्डाने स्वत: आयोजित केलेले कार्यक्रम यासाठी बोर्डाला बराच पैसा खर्च करावा लागतो. उदा. पुस्तिका, काही अभ्यासपूर्ण साहित्य मुद्रित करून ते विद्यार्थ्यांना वाचावयास देणे इ.साठी खर्च करावा लागतो.

५) वृत्तपत्र वर्गणी, डेडस्टॉक, दुरूस्ती महाराष्ट्र राज्य सहकारी संघ समासद वर्गणी रू. २००-००, पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक मंडळ समासद वर्गणी रू. १००-०० इत्यादी.

६) चेअरमन व इतरांना किंवा विभागीय मंडळाच्या किंवा जिल्हा सहकारी मुद्रणालय, या संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाण्यासाठी प्रवास खर्च द्यावा लागतो.

७) राष्ट्रीय सहकारी संघाच्या मार्गदर्शनाखाली राज्य सहकारी संघाच्यावतीने प्रत्येक जिल्हा सहकारी मंडळाद्वारे सहकारी सप्ताह १४ ते २० नोव्हेंबर या कालावधीत अखिल भारतीय स्तरावर साजरा केला जातो. यासाठी बोर्डाला बराच पैसा खर्च करावा लागतो.

८) वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी येणारा खर्च, आकस्मिक खर्च, शैक्षणिक कार्यक्रमांना लागणारी स्टेशनरी व ऑफिसच्या कामकाजासंबंधीचे कागद छापून घेणे यासाठी येणारा खर्च इ. खर्च तसेच व्यवसाय कर रू. ३००-०० डेडस्टॉक झीज, लायब्ररी झीज, सांख्यकीय पुस्तिका छपाई, ऑफीस भाडे (हे नाममात्र फक्त रू. १२-०० वार्षिक आहे).

९) परिषदेसाठी व्याख्याते बोलावणे, कार्यक्रमाचे आयोजन करणे यासाठी येणारा खर्च या खर्चाच्या प्रमुख बाबी आहेत.

शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यासाठी, स्वेच्छेने, सहकाराची उन्नती व्हावी म्हणून आ.श्री. गुलाबराव पाटील यांनी इमारत संस्थेला दिली आहे.

तसेच मार्केट यार्डातील जागा १९६२-६३ मध्ये मा. वसंतदादा पाटील यांनी सहकार भवनसाठी दिल्याचा उल्लेख अहवालात आढळतो.

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाच्या उत्पन्न खर्च व नफातोटा यासंबंधी १९५२ ते १९९० या काळातील माहिती पुढे सारणी क्र. ४.२ मध्ये दिली आहे.

<u>सारणी क्र. ४.२</u>

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाच्या उत्पन्न खर्च व नफा तोठयाची माहिती पुढीलप्रमाणे आहे

| वर्ष | उत्पन्न रू. | खर्च रू. | नफा रू. | तोटा रू. |
|---|---|---|---|---|
| १९५२ | ४,७२८ | ४,३२२ | ४०६ | - |
| १९५३ | १,२३६ | २,७६० | - | १,५२४ |
| १९५४ | २,६७५ | २,८९९ | - | २२४ |
| १९५५ | १,५२७ | २,१६९ | - | ६४२ |
| १९५६ | २,४२७ | २,४५५ | - | २८ |
| १९५७ | २,५९६ | २,५८० | १६ | - |

सारणी क्र. ४.२ (पुढे चालू...)

| वर्ष | उत्पन्न रू. | खर्च रू. | नफा रू. | तोटा रू. |
|---|---|---|---|---|
| १९५८ | ४,३५२ | २,५९० | १,७६२ | - |
| १९५९ | ४,७५७ | ४,७५७ | - | - |
| १९६० | ५,३३० | ४,३२८ | १,००२ | - |
| १९६१ | ६,२४२ | ५,९८३ | २५९ | - |
| १९६२ | ९,२४६ | ७,४४१ | १,८०५ | - |
| १९६३ | २२,१०९ | १४,६५१ | ७,४५८ | - |
| १९६४ | ११,६४० | ११,४१४ | २१४ | - |
| १९६५ | १९,१८९ | १९,२१४ | - | २५ |
| १९६६ | १४,६८९ | १४,६२५ | ६४ | - |
| १९६७ | १२,३८१ | १२,३३६ | ४५ | - |
| १९६८ | १२,२२५ | १०,५६३ | १,६९२ | - |
| १९६९ | १२,३६९ | ९,१९१ | ३,१७७ | - |
| १९७० | १५,९३२ | १२,५९३ | ३,३३९ | - |
| १९७१ | १३,७६० | १४,२५१ | - | ४६५ |
| १९७२ | ११४,१०१ | १३,३२५ | ७७६ | - |
| १९७३ | १३,७३८ | १५,१०३ | - | १,३६५ |
| १९७४ | २३,७०९ | २३,८२० | - | १११ |
| १९७५ | १४,११४ | १७,३९२ | - | ३,२७८ |
| १९७६ | १७,२१८ | १८,४८२ | - | १,२६४ |
| १९७७ | १२,५९१ | १५,९१५ | - | ३,३२४ |
| १९७८ | १६,४७१ | १६,०७३ | ३९८ | - |
| १९७९ | १५,७८४ | १८,१६७ | - | २,३८३ |
| १९८० | ८५,७०६ | ८८,६९७ | - | ३,०९१ |

<u>सारणी क्र. ४.२</u> (पुढे चालू...)

| वर्ष | उत्पन्न रू. | खर्च रू. | नफा रू. | तोटा रू. |
|---|---|---|---|---|
| १९८१ | १५,६६५ | १७,६६५ | - | २,१०० |
| १९८२ | २४,२५७ | १८,९३० | ५,३२७ | - |
| १९८३ | ३६,९११ | २७,३६९ | ९,५४२ | - |
| १९८४ | ३१,९०४ | २०,४८४ | ११,४२० | - |
| १९८५ | १७,८२६ | २१,५४४ | - | ३,७१८ |
| १९८६ | १९,२९९ | २१,२२६ | - | १,९२७ |
| १९८७ | १८,४८६ | २३,३४५ | - | ४,८५९ |
| १९८८ | २३,४४१ | २६,११८ | - | २,६७७ |
| १९८९ | ४२,७९५ | ३७,५५१ | ५,२४४ | - |
| १९९० | ४४,५३० | ४३,४४४१ | १,०८९ | - |

आधार : सारणी क्र. ४.१ प्रमाणे

## सारणी क्र. ४.३


१९५१ ते १९९० या कालखंडातील जिल्हा सहकारी बोर्डाच्या उत्पन्न व खर्चाची प्रत्येक पाच वर्षांची सरासरी

| वर्ष | उत्पन्न रू. | खर्च रू. | नफा रू. | तोटा रू. |
|---|---|---|---|---|
| १९५१-५६ | २,५१८ | २,८५१ | - | ३४७ |
| १९५७-६१ | ४,६५५ | ४,०४७ | ६०८ | - |
| १९६२-६६ | १५,३७६ | १३,४७३ | १,९०३ | - |
| १९६७-७१ | १३,३३९ | ११,७८७ | १,५५२ | - |
| १९७२-७६ | १६,५७६ | १७,६२४ | - | १,०४८ |
| १९७७-८१ | २९,२२३ | ३१,३२३ | - | २,१०० |
| १९८२-८६ | २६,०३९ | २१,९१० | ४,१२९ | - |
| १९८७-९० | ३२,३१३ | ३२,६१३ | - | ३०० |

आधार : वार्षिक अहवाल - सांगली जिल्हा सहकारी बोर्ड लि., १९५१ - १९९० वरून संकलित.

सांगली जिल्हा सहकारी बोर्ड ही प्रामुख्याने शैक्षणिक कार्यक्रम राबविणारी सेवाभावी संस्था आहे. व्यवसाय करणारी संस्था नाही. त्यामुळे नफ्यातोटयाचा विचार येथे केला जात नाही.

या बोर्डाचे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत म्हणजे राज्य सहकारी संघाकडून मिळणारे अनुदान, सभासद वर्गणी, सहकारी क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची स्मरणिका काढून उत्पन्न मिळवणे, त्या मानाने खर्चाची बाबी जास्त आहेत.


आलेख - क्र. 2
पंचवार्षिक नफा तोटा (सरासरी)
1 सेमी = 300 रु.
नफा
तोटा
(1957-61)
(1962-66)
(1967-71)
(1977-81)
(1982-86)
3600
3300
3000
2700
2400
2100
1800
1500
1200
900
600
300
-300
-600
-900
-2100
-2700
-3000
-3300
-3600
-4000

१) १९५१ ते १९५६ या साली संस्थेला झालेला सरासरी तोटा रु. ३४७-०० चा आहे. या काळात व्यक्ती समासद व आजीव समासदांची संख्या कमी होती. राज्य सरकारकडून मिळणारे वार्षिक अनुदानही कमी होते पण त्या मानाने खर्च जास्त होता. सारणी क्र. ४.४ पहा.

२) १९५७ ते १९६१ पर्यन्त समासद संख्येत वाढ झाली आहे. व्यक्ती समासद व संस्था समासद यांच्या संख्येत वाढ झाली त्यामुळे त्या काळात सरासरी नफा रु. ६०८-०० होता.

३) १९६२-६६-७१ पर्यन्त समासद संख्येत सातत्याने वाढ होत गेली आहे. सहाजिकच या काळात बोर्डाला रु. १९०३-०० व १५५२-०० इतका सरासरी नफा झाला.

४) १९७२-७६ या काळात बोर्डाला रु. १०४८-०० तोटा झाला त्याची कारणे पुढीलप्रमाणे होती :

१. समासद संख्या वाढली तरी समासद वर्गणीचे दर कमी होते.
२. राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानात वाढ झाली नाही.

५) १९७७ ते ८१ या काळातही बोर्डाला तोटा सोसावा लागला त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे होती :

१. शैक्षणिक कार्यक्रमांची संख्या वाढली.
२. व्यक्ती समासद संस्था समासद यांची संख्या वाढली पण समासद वर्गणीचे दर जुनेच राहिले.
३. राज्य सरकारच्या अनुदानात वाढ नाही.
४. व्यवस्थापकीय खर्चात वाढ झाली इत्यादी.

६) १९८२ ते ८६ या काळात बोर्डाला विक्रमी नफा झाला. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :

१. स्मरणिका नियतकालिके यांच्या प्रकाशनापासून मिळालेले उत्पन्न, देणग्या, ट्रस्ट, जाहिरातीपासून मिळालेले उत्पन्न इत्यादीमुळे बोर्डाकडील शिल्लक वाढली.

२. व्यक्ती सभासद, संस्था सभासद यांच्या संख्येत वाढ झाली व त्या बरोबरच उत्पन्नही वाढले.

७) १९८७ ते १९९० या काळात बोर्डाला पुन्हा तोटा झालेला दिसून येतो. त्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :

१. शैक्षणिक कार्यक्रमांची संख्या वाढली

२. त्यासाठी मिळणारे अनुदान अपुरे होते.

८) इ.स. १९९१ साली मात्र राज्य सहकारी संघाने वार्षिक रू. १५००० ऐवजी रू. २२,५००-०० वार्षिक अनुदान दिले आहे.

बोर्डाच्या नफा तोटयासंबंधीचा तपशील आलेख क्रमांक ४.१ वरून स्पष्ट होतो.

४.८ मूल्यमापन :

समाजात सहकारी शिक्षणाचा प्रचार, प्रसार व्हावा, सहकारी संस्था अधिक कार्यक्षम व्हाव्यात, तसेच शिक्षित मनुष्यबळाचा सहकाराच्या विकासासाठी वापर करण्यात यावा या हेतूने सांगली जिल्हा सहकारी बोर्डाने केलेले प्रयत्न स्पृहणीय आहेत. तशी ही व्यवसाय करणारी, नफा मिळवणारी संस्था नव्हे, तर ती सेवा भावी संस्था आहे.

समाजाला सहकाराभिमुख जागरूक सभासद वर्ग तयार करणे व सहकारी संस्थेच्या आर्थिक विकासासाठी त्याचा वापर करणे हे काम जिल्हा सहकारी बोर्ड करते.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

जिल्हा सहकारी बोर्डाला पूर्णपणे राज्य सहकारी संघाकडून अनुदान मिळते.

राज्य सहकारी संघाने दिलेले शैक्षणिक कार्यक्रम राबवणे हे बोर्डाच्या स्थापनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

बोर्डाचा व्यवस्थापन खर्च, शैक्षणिक कार्यक्रमासाठी येणारा खर्च या खर्चापेक्षा मिळणारे अनुदान कमी आहे. त्यामुळे बोर्डाला बऱ्याच वेळा तोटा सहन करावा लागतो.

जादा उत्पन्न मिळवण्यासाठी बोर्डाने मा. गुलाबरावजी पाटील यांच्या स्मरणिकेच्या प्रती छापल्या व त्यातून त्याना बरीच रक्कम मिळाली. १९९१ या वर्षी बोर्डाच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसते.

या पुढील प्रकरणात बोर्डाने केलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाचा आढावा घेऊ.

—x—x—x—x—x—

परिशिष्ट ८
3.3.

| अ. नं. संस्था | मिरज | क. महांकाळ | जत | आटपाडी | खानापूर | तासगांव | वाळवा | शिराळा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ सां. जि. म. सह. बँक | १ | — | — | — | — | — | — | — | १ |
| २ सेवा संस्था | ५५ | ३९ | ५८ | ३५ | ९३ | ८७ | ९१ | ५४ | ५१२ |
| ३ धान्य बँका | — | — | — | — | — | १ | — | — | १ |
| ४ अर्बन बँक | ११ | — | १ | — | २ | ३ | ५ | १ | २३ |
| ५ पगारदार संस्था | ७८ | ५ | ४ | २ | ७ | १४ | १७ | ४ | १३१ |
| ६ नागरी पत संस्था | १०४ | २० | ८ | ११ | ३० | ३४ | ८१ | १५ | ३०३ |
| ७ खरेदी विक्री संघ | ४ | १ | १ | १ | १ | २ | १ | १ | १२ |
| ८ साखर कारखाने | १ | १ | — | १ | १ | १ | २ | १ | ८ |
| ९ इतर प्रक्रिया संस्था | ४ | १ | — | — | — | २ | ३ | — | १० |
| १० सूत गिरणी | २ | — | — | — | २ | — | २ | — | ६ |
| ११ विणकर संस्था | ४ | ३ | १ | ५ | १० | ७ | ३ | — | ३३ |
| १२ इतर औद्यो. संस्था | ३८ | २ | ६ | ५ | ४ | ६ | २२ | ५ | ८८ |
| १३ दूध संघ | २ | १ | — | — | — | — | १ | — | ४ |
| १४ दूध संस्था | ८४ | ६७ | ७७ | ३० | ५५ | ७२ | १२७ | ८२ | ५९४ |
| १५ मच्छिमार संस्था | ५ | २ | ७ | २ | ४ | २ | ५ | १६ | ४३ |
| १६ कुक्कुट पालन संस्था | ११ | ३० | ८ | १ | १२ | ७ | १० | ५ | ८४ |
| १७ औद्योगिक वसाहत | ३ | — | — | — | १ | २ | — | — | ६ |
| १८ सहकारी शेती संस्था | ४ | ५ | १३ | १ | — | १ | १ | २ | २७ |
| १९ पाणी पुरवठा संस्था | ३० | १३ | ११ | १६ | २६ | ५६ | ७३ | १० | २३५ |
| २० ग्राहक संस्था | ४१ | ९ | ४ | ३ | ७ | १३ | १२ | ६ | ९५ |
| २१ गृहनिर्माण संस्था | १५९ | ४ | १३ | [illegible] | ३ | २५ | २७ | १ | २३५ |
| २२ मजूर संस्था | ३६ | १६ | २० | १८ | १४ | २७ | २१ | १५ | १६७ |
| २३ बीज संस्था | — | — | — | — | १ | १ | — | — | २ |
| २४ इतर संस्था | ४ | १ | २ | — | — | २ | ५ | — | १४ |
| २५ जिल्हा देखरेख संघ | १ | — | — | — | — | — | — | — | १ |
| २६ जिल्हा सहकारी बोर्ड | १ | — | — | — | — | — | — | — | १ |
| २७ फेडरेशन | १ | | | | | | | | |
| १ बँक | | — | — | — | — | — | — | — | १ |
| २ शेती | १ | — | — | — | — | — | — | — | १ |
| ३ औ. वसा. संघ | १ | — | — | — | — | — | — | — | १ |
| ४ नागरी | १ | — | — | — | — | — | — | — | १ |
| एकूण | ६८७ | २२० | २३४ | १३४ | २७३ | ३६५ | ५०९ | २१८ | २६४० |

## प्रकरण पाचवे

## सांगली जिल्हा सहकारी बोर्डाचा शैक्षणिक कार्यक्रम

५.१ सांगली जिल्हा सहकारी बोर्डाचा शैक्षणिक आकृतीबंध

५.२ सभासद सचिवांचा कार्यक्रम

५.२.१ परिषद

५.२.२ पदाधिकारी वर्ग

५.२.३ सेवक अल्पमुदत वर्ग

५.२.४ वक्तृत्व स्पर्धा

५.२.५ निबंध स्पर्धा

५.२.६ परिसंवाद

५.२.७ सहकार दिन

५.३ सहकारी प्रशिक्षण निदेशकांचा कार्यक्रम

५.३.१ सहकारी कार्यकर्ता शिबिरे

५.३.२ सहकारी कार्यकर्ता मेळावे

५.३. सहकारी प्रशिक्षण निदेशकांचा कार्यक्रम

५.३.१ सहकारी कार्यकर्ता शिबिरे

५.३.२ सहकारी कार्यकर्ता मेळावे

५.३.३ महिला सहकारी शिबिरे व महिला सहकारी मेळावे

५.३.४ पंच कमिटी वर्ग

५.३.५ सचिव उजळणी वर्ग

५.३.६ युवक शिबिरे

५.३.७ युवक मेळावे

५.३.८ वार्षिक सभांना उपस्थिती

५.३.९ ग्राम सभा

५.३.१० सहकारी ध्वज

५.४ सभासद सचिवांच्या व सहकार प्रशिक्षण निदेशकांच्या अडचणी

५.५ उपसंहार

सहकारी संस्थांच्या गुणात्मक आणि संख्यात्मक वाढीसाठी सहकारी प्रबोधन अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ ही प्रवक्ता संस्था आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे व पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ मर्यादित, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हात सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे कार्य करणारी जिल्हा पातळीवर बोर्ड ही एकमेव संस्था आहे. सांगली जिल्हातील सहकारी चळवळ गतिमान वर्धिष्णु व विविधांगी आहे. जिल्हातील सहकारी चळवळीची गुणात्मक वाढ व्हावी व सहकारी चळवळीचा समाजातील दुर्बल घटकांना जास्तीतजास्त लाभ व्हावा, तसेच सहकारी चळवळीतील पदाधिकारी, सभासद सेवक हे जागृत जाणकार अभ्यासू व्हावेत या दृष्टीने सहकारी चळवळीचे प्रबोधन करण्याचे महत्वपूर्ण कार्य विविध माध्यमाद्वारे आणि कार्यक्रमाद्वारे बोर्ड गेली ४१ वर्षे अव्याहतपणे करत आहे.

## ५.१ सांगली जिल्हा सहकारी बोर्डाचा शैक्षणिक आकृतीबंध :

सर्वसाधारणपणे जिल्हा सहकारी बोर्डाचा शैक्षणिक कार्यक्रम दोन गटामध्ये विभागलेला असतो. १) सभासद सचिवांचा कार्यक्रम, २) सहकार प्रशिक्षण निदेशकांचा शैक्षणिक कार्यक्रम. राज्य सहकारी संघाने ठरवून दिलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांची अंमलबजावणी जिल्हा सहकारी बोर्ड करीत असते. शिक्षण प्रशिक्षणाचा अभ्यासक्रमही राज्य सहकारी संघ ठरवित असते.

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाच्या शैक्षणिक कार्यक्रमाचा आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

१) सभासद सचिवांचा वार्षिक कार्यक्रम

| अनु. | शैक्षणिक कार्यक्रमांचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १. | परिषद | १ |
| २. | पदाधिकारी वर्ग | १ |
| ३. | सेवक अल्प मुदत वर्ग | १ |
| ४. | वक्तृत्व स्पर्धा | १ |
| ५. | निबंध स्पर्धा | १ |
| ६. | परिसंवाद | १ |
| ७. | सहकार दिन | १ |
| ८. | सहकार सप्ताह | १ |
| ९. | शैक्षणिक प्रचार | |

२) सहकार प्रशिक्षण निदेशकांचा वार्षिक कार्यक्रम

| अनु. | शैक्षणिक कार्यक्रमाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १. | सहकारी कार्यकर्ता शिबिरे | १० |
| २. | सहकारी कार्यकर्ता मेळावे | २० |
| ३. | महिला व सहकारी शिबिरे | २ |
| ४. | महिला सहकारी मेळावे | २ |
| ५. | पंचसमिती वर्ग | १८ |
| ६. | सचिव उजळणी वर्ग | ३ |
| ७. | युवक शिबिरे | ३ |
| ८. | शालेय व्याख्याने | ३० |
| ९. | वार्षिक सभांना उपस्थिती | १५ |
| १०. | ग्राम सभा | १५ |
| ११. | युवक सहकारी मेळावे | ३ |

वरील बोर्डाचे शैक्षणिक कार्यक्रम एक वर्षाच्या कालावधीत घेतले जातात. कार्यक्रमांची संख्या कमीत कमी आहे. शक्य असल्यास आणखी शैक्षणिक कार्यक्रम राबवावेत असे धोरण असते.

वरील कार्यक्रमांची व्याप्ती, अभ्यासक्रम सहभाग, त्यांची उपस्थित संख्या या बाबींची सविस्तर माहिती पाहू.

५.२ <u>सभासद सचिवांचा कार्यक्रम</u> :

५.२.१ <u>परिषदा</u> -

सांगली जिल्हाच्या कक्षेत येणाऱ्या व सर्वप्रकारच्या सहकारी संस्थामधील सभासदांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, सहकारी क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची व्याख्याने आयोजित करणे, सभासद शेतकऱ्यांच्या व इतर संस्थामधील सभासदांच्या आर्थिक हितरक्षणासाठी कार्य करण्यास प्रवृत्त करणे या उद्देशाने सहकारी परिषदा घेतल्या जातात.

सहकारी संस्थांच्या विविध प्रश्नांची चर्चा करून सहकारी चळवळीचा विकास जलद गतीने साधणेसाठी परिषदेचे कामकाज उपयुक्त ठरले आहे.

आतापर्यन्त सांगली जिल्हा सहकारी बोर्डाने शेती सेवा संस्था, अर्बन बँका, दूध संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा सहकारी भू-विकास बँका, बिगर शेती पतपुरवठा संस्था, धान्य सहकारी संस्था, इतर विपणन संस्था, शेती पाणीपुरवठा संस्था, मच्छीमार सहकारी संस्था, खांडसरी व गूळ सहकारी संस्था, सहकारी तेल गिरण्या, सहकारी साखर कारखाने, ग्राहक सहकारी संस्था, गृहनिर्माण, विणकर, औद्योगिक सहकारी, कुक्कुटपालन, जिल्हा सहकारी बोर्ड, सुपरवायझिंग, युनियनस् वराह पालन, सहकारी संस्था, कॅटल ब्रीडींग सहकारी सोसायटी, सहकारी चित्रपट संस्था हे. संस्थातील संबंधित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन झाले आहे.

या बरोबरच मागासवर्गीय सहकारी संस्थेच्या कार्यकर्त्यांची परिषदही घेतली जाते. अशा परिषदेत धरबांधणी, शेती मजूर, इ.च्या समस्येबद्दल विचार करण्यात येतो.

परिषदेत शेती सहकारी संस्थासाठी शेती पतपुरवठ्यातील अडीअडचणी समजावून घेतल्या जातात. सहकारी बँकांचे कर्जधोरण, कर्ज वाटपपध्दती इ. बद्दल मार्गदर्शन केले जाते.

दूध सहकारी संस्थांच्या परिषदेमध्ये दुग्धविकास, पशुसंवर्धन, याबाबतीत मार्गदर्शन केले जाते.

थोडक्यात, सहकारी संस्थेच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे हा परिषदेचा प्रधान हेतू असतो.

परिषदेसाठी मिळणारे वार्षिक अनुदान रू. २०००-०० इतके आहे. पूर्वी ते रू. १०००-०० पर्यन्त होते.

सांगली जिल्हासहकारी बोर्डाच्या आदी स्थापनेपासूनच अशा परिषदा घेतल्या जातात. (सारणी क्र. ५.१ पहा). प्रत्येक परिषदेत सहभागी होणा-या लोकांची संख्याही ब-यापैकी आहे. विशेषत: १९७१ साली अशा परिषदेस २००० लोक सहभागी झाले होते. १९७२ व १९७४ सालीही १५०० पर्यन्त व्यक्तींचा सहभाग होता. १९८७-८८ हे वर्ष वगळता १९८२ ते १९९० पर्यन्त सहभागी व्यक्तींची संख्या ५०० पर्यन्त स्थिर दिसते.

५.२.२ <u>पदाधिकारी वर्ग</u> -

जिल्हातील सहकारी संस्थांच्या अप्रशिक्षित पदाधिका-यांना सहकारी शिक्षण मिळावे, तसेच होतकरू व नवीन सहकारप्रेमी लोकांना सहकारी शिक्षण मिळून उत्साही व जागृत पिढी निर्माण करण्याकरिता संस्थेच्या विद्यमाने पदाधिकारी शिक्षण वर्ग चालविण्यात येतात.

या वर्गासाठी स्कूल बोर्डाचे प्राथमिक शिक्षक, सहकारी संस्थामधील चालक व नोकरवर्गास उपस्थित होता येते. सहकारी संस्थेत काम करताना येणाऱ्या अडचणींसंबंधी चर्चा करून त्या सोडविण्याच्या कामी पदाधिकारी वर्ग उपयुक्त ठरतो.

सहकारी बँकामधील कर्ज वाटप, कर्जाचे धोरण, कर्जाच्या समस्या, इ. बाबतचे योग्य नियोजन करण्यासाठी पदाधिकारी वर्ग चालवले जातात. पदाधिकाऱ्यांना कायदे उपकायदे यांचे ज्ञान व्हावे, यासाठी हे वर्ग चालवले जातात. हे वर्ग १९८५ सालापासून सुरू झाले. या वर्गासाठी उपस्थित असणाऱ्या पदाधिकाऱ्यांची संख्या १० ते ३२ पर्यन्त आहे. या वर्गाची मुदत ५ दिवसांची असून विद्यावेतन एका दिवसाला एका विद्यार्थ्याला रु. १०-०० असे आहे. एक पदाधिकारी वर्ग घेण्यासाठी राज्य सहकारी संघाकडून रु. १०००-०० अनुदान मिळते.

### ५.२.३ सेवक अल्पमुदत वर्ग -

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक सहकारी संस्थांच्या सेवकांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी असे वर्ग आयोजित केले जातात. पण दुग्धविकास सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, अशा वेगवेगळ्या स्वरूपाच्या संस्थेतील सेवकांना त्या त्या संस्थेच्या अनुषंगाने आवश्यक असे शिक्षण दिले जाते. उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या कमीत कमी २० असावी लागते. विद्यावेतन प्रत्येक दिवसाला रु. ५-०० प्रत्येक विद्यार्थ्याला दिले जाते. ५ दिवसांचे वर्ग घेतले जातात. प्रत्येक तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असे वर्ग घेतले जातात. १९७१ सालापासून असे वर्ग घेतले जातात. १९७२ साली सहभागी विद्यार्थ्यांची संख्या सर्वात जास्त, ९७ होती व ३ वर्ग घेतले गेले.

५.३.४ <u>वक्तृत्व स्पर्धा</u> -

महाविद्यालयीन युवकामध्ये सहकारी तत्वप्रणाली रुजावी, वाढावी व युवकांची शक्ती सहकारी, चळवळीसाठी उपयोगी पडावी, युवकांनी सहकारी चळवळीच्या विकासासाठी आपल्या ज्ञानाचा वापर करावा, यासाठी महाविद्यालयीन पातळीवर ३ दिवसांचा युवक शिबिराचा कार्यक्रम आयोजित केला जातो. यासाठी शिबिरार्थींची उपस्थित कमाल मर्यादा ४० असावी लागते. प्रत्येक विद्यार्थ्याला १ दिवसाला १ रुपया याप्रमाणे विद्यावेतन दिले जाते. १९८२ पासून हे वर्ग सुरू झालेले दिसतात. सहभागी विद्यार्थ्यांची संख्या ९ ते १२ अशी आहे.

५.२.५ <u>निबंध स्पर्धा</u> -

शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातात. लहान वयातच सहकारी शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, पुढील काळात त्यांनी सहकारी तत्वप्रणाली अंगी बाणवावी व त्याचा वापर सहकाराच्या विकासासाठी करावा या हेतूने निबंध स्पर्धा घेतल्या जातात.

यासाठी मिळणारे अनुदान एकूण रु. २५०-०० असते. त्यापैकी प्रथम क्रमांकास रु. ५०-००, द्वितीय क्रमांकास रु. ३०-०० आणि तृतीय क्रमांकास रु. २०-०० असे अनुदान वितरित केले जाते.

उर्वरित खर्चाची विभागणी कार्यक्रमाचे संयोजन करणे, पत्रव्यवहार करणे, निबंध आल्यानंतर त्याचा परीक्षण खर्च, जिल्हाचे उपनिबंधक, बँकेचे कार्यकारी संचालक, जिल्हा बँकेचे १ प्रतिनिधी, २ तज्ञ प्राध्यापक यांच्या परीक्षणाच्या फलित गुणवत्तेनुसार क्रमांक काढले जातात.

निबंध स्पर्धा १९८१ सालापासून घेण्यात आल्या. १९८१ ते १९९० पर्यन्त या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग दिसून येतो.

५.२.६ पुरिसंवाद -

ग्रामीण भागातील व नागरी भागातील पतसंस्थांच्यच अडचणी सोडवण्यासाठी परिसंवाद आयोजित केले जातात. १९७४ पूर्वी या अभ्यासक्रमाचे स्वरूप " फील्डवर्कर्स कॉन्फरन्स " असे होते. १९५२ पासून अशी फील्ड वर्कर्स कॉन्फरन्स घेतली जात होती. त्यामध्ये सर्वप्रकारच्या सहकारी संस्थांना एकत्रितपणे मार्गदर्शन केले जात होते. पण प्रत्येक सहकारी संस्थेचे स्वरूप वेगळे, त्यांचे प्रश्न वेगळे, अडचणी वेगळया त्यामुळे असे कार्यक्रम एकत्रित घेण्याची पध्दत बंद झाली व प्रत्येक विभागाच्या, प्रत्येक संस्थेच्या अडी-अडचणी समजावून घेऊन त्याना मार्गदर्शन करण्यासाठी परिसंवाद आयोजित केले जाऊ लागले. राज्य सहकारी संघाने प्रत्येक जिल्ह्यासाठी २ परिसंवाद आयोजित करावेत असे सुचवले आहे. प्रत्येक परिसंवादासाठी रू. १०००-०० अनुदान दिले जाते. परिसंवाद १ दिवसाचा असतो. १९८२ साली परिसंवादास उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या सर्वात जास्त म्हणजे १००० अशी दिसून येते. १९९० पर्यन्त या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळालेला दिसतो.

५.२.७ सहकार दिन व सहकारी सप्ताह -

काही देशात सहकार दिन जुलै महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी साजरा केला जातो. भारतातही सहकार दिन आणि सहकार सप्ताह साजरे केले जातात.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशात सहकारी चळवळीला गती देण्याच्या उद्देशाने सहकारी सप्ताह साजरा केला जावा असे प्रत्येक सहकारी स्तरावर कळविले. व्याख्याने, परिसंवाद आयोजित करून सहकाराची महती लोकांना पटवून द्यावी या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सहकारी सप्ताहाच्या निमित्ताने चार ठिकाणी व्याख्याने व्हावीत असे सुचवले. मा. पंतप्रधान पंडित नेहरूंच्या जन्मदिनी १४ नोव्हेंबर दिवशी सहकार दिन साजरा केला जावा आणि त्यानंतर सलग ६ दिवस

असे एकूण सात दिवस ` सहकारी सप्ताह ` म्हणून साजरा करावा असे ठरले. अशा सप्ताहास १९५१ पासून सहकारी क्षेत्रातील कार्यकर्ते, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, निमंत्रित असे सर्व मिळून १०० ते ३७० प्रतिनिधी कार्यक्रमास उपस्थित राहिले असे आढळून येते. (सारणी क्र. ५.१ पहा) १९५२ पासून १९९० पर्यन्त अखंडपणे हा कार्यक्रम चालू आहे.

### ५.२.८ शैक्षणिक प्रचार, वाङ्.मय प्रसिध्दी -

सहकारी शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने सहकारी वाङ्.मयाचे स्थान महत्वपूर्ण आहे. याची जाणीव ठेवून सहकारी बोर्डाने सहकारी जगत, सांख्यिकीय पुस्तिका इ. काढून प्रसिध्द केल्या आहेत. सहकारी मुद्रणालयाचे १९६२ साली शेअर्स खरेदी करून सहकारी चळवळीच्या वाङ्.मयीन विकासास हातभार लावला आहे.

तसेच भित्ती पत्रके, सहकारी म्हणी याचा वापर करून ग्रामीण भागात सहकारास प्रोत्साहन देण्यात येते.

ग्रामीण व अर्धनागरी भागात सहकारी संस्थामधील सभासदांचे मेळावे विभागीय स्तरावर भरवून त्यांच्या गरजांवर भर देऊन सहकारी चळवळ त्या गरजा कश्या पध्दतीने सोडवू शकेल या दृष्टीने प्रयत्न केले गेले.

## ५.३ सहकारी प्रशिक्षण निदेशकांचा कार्यक्रम :

### ५.३.१ सहकारी कार्यकर्ता शिबिरे -

सहकारी कार्यकर्ता शिबिरे गाव पातळीवरच्या सहकारी संस्थांच्या पंचकमिटी सदस्य व पदाधिकारी यांच्यासाठी राबवली जातात. १९८६ पूर्वी ही शिबिरे सर्व सहकारी संस्थासाठी एकत्रितरित्या घेतली जात होती. १९८६ नंतर प्रत्येक प्रकारच्या सहकारी संस्थांच्या अडचणी लक्षात घेऊन त्या त्या प्रकारच्या संस्थेसाठी अशी शिबिरे आयोजित केली जातात. ४५ मिनिटांचे एक व्याख्यान व १५ मिनिटे चर्चा असे स्वरूप असलेल्या शिबिराची

मुदत ३ दिवसांची असते १९८६ पूर्वी शिबिरार्थींना प्रत्येकी रु. ३ ते ५ विद्यावेतन दिले जात असे. हे विद्यावेतन प्रवास खर्चासाठी असे. उपस्थिती वाढावी म्हणून असे प्रयत्न केले जात होते. सहकारी प्रशिक्षण निदेशक, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे इन्स्पेक्टर व सहायक निबंधक, तालुक्याचे सहायक निबंधक यांच्या सहकार्याने ठराविक प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थिती, त्यांचे प्रश्न अडचणी या अनुषंगाने अभ्यासक्रम तयार करून वरील अधिकारी व शिबिरार्थी यांचेशी चर्चा करून मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला जात असे. प्रामुख्याने क व ड या लेखा वर्गातील सहकारी संस्थांचे व्यवस्थापन सुधारावे, आर्थिक अडीअडचणींची सोडवणूक व्हावी म्हणून अशाप्रकारच्या सहकारी संस्थांची निवड केली जाते. या संस्थांना मार्गदर्शक ठरतील अशा प्रगतीशील ` अ ` वर्गातील संस्थांचे मार्गदर्शन मिळवले जाते. या शिबिरासाठी ४० शिबिरार्थी आवश्यक असतात. प्रामुख्याने १९६१ पासून अशी शिबिरे भरविण्यात येऊ लागली. १९९० साली सर्वात जास्त १३ शिबिरे घेतली गेली. उपस्थित शिबिरार्थींची संख्याही समाधानकारक आहे. १९७० नंतर नियमितपणे अशी शिबिरे भरवलेली दिसून येतात. शिबिरार्थींकडून मूल्यमापन फॉर्म भरून घेतले जातात.

### ५.३.२ सहकारी कार्यकर्ता मेळावे -

हा कार्यक्रम राज्याच्या प्रत्येक विभागासाठी वेगळा आहे. याची मुदत १ दिवसाची असते. मात्र मेळाव्यात मूल्यमापन फॉर्म भरून घेतले जात नाहीत. या मेळाव्यात प्राथमिक स्तरावरील सहकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले जाते. सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी असे मेळावे भरवले जातात. तज्ञ मार्गदर्शक व एकमेकांशी चर्चा करून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. संबंधित कार्यकक्षेच्या बाहेरील विषय जर चर्चेसाठी आले तर ठराव मांडून त्याचे विवरण करून संबंधित विभागाकडे पाठवला जातो. कार्यक्रमाच्या सहभागाकडे पाहिले असता असे दिसून येते की, सहकारी कार्यकर्ता मेळाव्यांची संख्या सहकारी कार्यकर्ता

शिबिरापेक्षा कमी आहे. १९६३ साली २ मेळावे घेतले गेले. त्यानंतर १९८६ व १९९० पर्यन्त दरवर्षी मेळावे घेतले गेले. सर्वात जास्त मेळावे १९८७ साली घेतले गेले व उपस्थितांची संख्या सर्वात जास्त १९८९ साली होती.

### ५.३.३ महिला सहकारी शिबिरे व महिला सहकारी मेळावे -

सहकारी कार्यकर्ता शिबिरांप्रमाणेच महिला सहकारी शिबिरे व मेळावे भरवले जातात. एकंदर लोकसंख्येपैकी सुमारे ५० टक्के महिलांचे प्रमाण आहे. पण सहकारातील त्यांचा सहभाग नगण्य आहे. एकंदर महिलांच्या केवळ १ ते २ टक्के महिला सहकारी क्षेत्रात आहेत. सहकारातील महिलांचा सहभाग वाढावा, महिलांच्यामध्ये जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने सहकारी शिबिरे व मेळावे आयोजित केले जातात.

सर्वसाधारणपणे १९६२ पासून महिला सहकारी शिबिरे आयोजित केली आहेत. १९६४ साली सर्वात जास्त ६ शिबिरे आयोजित केली. शिबिरार्थींची संख्या १९९० सालच्या मेळाव्यात सर्वात जास्त म्हणजे १२१ इतकी आहे.

१९८७ साली एकंदर महिला सहकारी मेळावे ३ घेतले गेले त्यात शिबिरार्थींची संख्या २७७ इतकी होती. १९८९ साली फक्त १ मेळावा घेतला. १९९० साली २ मेळावे आयोजित केले गेले. त्या वर्षी शिबिरार्थींची संख्या १९५ आहे. १९८१ ते १९९० या दशकातच सहकारातील महिलांचा सहभाग तुलनात्मकदृष्ट्या वाढलेला दिसतो

### ५.३.४ पंच कमिटी वर्ग -

पंच कमिटी वर्ग सध्या विनाविद्यावेतन चालवावे लागतात. जिल्हा सहकारी बोर्डाचे स.प्र. निदेशक हे बोर्डाच्या आराखड्यानुसार संबंधित संस्थेकडे जाऊन संस्थेची पंच कमिटी पदाधिकारी, सचिव, लेखनिक व सभासद

यांच्याशी चर्चा करून संस्थेची माहिती घेतात. सहकारी संस्थेचे सभासद, कर्ज धोरण, कार्यक्षेत्रातील उलाढाल, त्या गावातील महत्त्वाची पीके, गावातील इतर संस्था, गावातील आरोग्याच्या व इतर शैक्षणिक सेवा-सुविधा यासंबंधी माहिती घेतात. संबंधित संस्थेच्या अडचणींसंबंधी माहिती घेऊन अभ्यासक्रम तयार केला जातो. सहकारी संस्थेचे महत्त्व, संस्थांतर्गत प्रगती इ. विषयावर पंच कमिटी व सभासद वर्ग व पदाधिकारी वर्गाला सतत तीन दिवस मार्गदर्शन करतात.

सदरचा वर्ग दररोज कमीत कमी चार तास चालतो. सदर वर्गाला गाव पातळीवरचे सभासद व पंच उपस्थित असतात.

बोर्डाच्या स्थापनेपासून १९५२ ते १९९० पर्यन्त पंच कमिटी वर्ग सातत्याने घेतले जातात. १९५९ साली पंच कमिटी वर्ग सर्वाधिक ९८ घेतले गेले व सर्वात कमी १९७७ साली एक वर्ग घेतला गेला. सहभागी होणाऱ्यांची संख्या १९६२ साली सर्वाधिक म्हणजे २७२४ होती.

५.३.५ <u>सचिव उजळणी वर्ग</u> -

हा वर्ग प्राथमिक स्तरावरील सहकारी संस्थांसाठी आयोजित केलेला असतो. सहकारी संस्थातील सचिवांसाठी व खास शिफारस असेल तर लिपिकांनासुध्दा या वर्गास खास बाब म्हणून प्रवेश दिला जातो. वर्ग आयोजित करण्यापूर्वी सहकारी खाते, जिल्हा मध्यवर्ती बँका, संबंधित विभागाच्या संस्था यामधील सचिवांची अर्हता, गुणवत्ता यांचा विचार करून वर्गाचे आयोजन केले जाते. यामध्ये पंचायत समितीच्या प्रमुखांनाही निमंत्रित केले जाते. हे वर्ग मुख्यत: तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाणी घेतले जातात. शासनाच्या फळबागा, सामाजिक वनीकरण, कुक्कुटपालन, मच्छीमार, शेती सहकारी संस्था, पतसंस्था इ. विषयातील अडचणी सोडवण्यासाठी त्या विषयाच्या अनुषंगाने व्याख्याने आयोजित केली जातात. सदर वर्गास

उपस्थित असणाऱ्या सचिवाला दररोज रु. ५-०० प्रमाणे विद्यावेतन दिले जाते. ५ दिवसांचे हे वर्ग असतात. या वर्गात फक्त २५ सचिवांना प्रवेश दिला जातो. चांगल्या सहकारी संस्थांचे दप्तरी कामकाज व इतर कामकाज यांचे प्रत्यक्ष ज्ञान व्हावे म्हणून प्रात्यक्षिकेही घेतली जातात.

बोर्डाच्या स्थापनेपासून हे वर्ग १९७५ पर्यन्त नियमितपणे घेतले जात होते त्यानंतर १९८२ ते १९८६ या वर्षी हे वर्ग घेतले गेले. दरवर्षी २ ते ५ सचिव उजळणी वर्ग घेतले गेले. उपस्थितांची संख्या दरवर्षी बरी आहे. १९८६ नंतर बोर्डाच्या शैक्षणिक कार्यक्रमात बदल झालेला दिसून येतो.

५.३.६ <u>युवक शिबिरे</u> -

महाविद्यालयीन युवकांना ह सहकाराचे मूलभूत ज्ञान मिळावे या हेतूने युवक शिबिरे आयोजित केली जातात. विद्यार्थी संख्या ४० असून शिबिर तीन दिवसांचे असते व दररोज रु.१-०० विद्यावेतन दिले जाते. राज्य सहकारी संघाचे प्रमाणपत्र शिबिरार्थींना दिले जाते. युवक शिबिरे १९५९ व १९६० साली घेतली गेली. १९७३ व १९७५ ते १९९० अखेर युवक शिबिरे आयोजित केलेली दिसून येतात. १९८६ साली युवक शिबिरे सर्वाधिक, सहा घेतली गेली. शिबिरार्थींची संख्या १९७२ ते १९९० या काळात समाधानकारक होती.

५.३.७ <u>युवक मेळावे</u> -

सहकारी तत्वज्ञान प्राथमिक स्तरावर रूजावे या हेतूने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी युवक मेळावे आयोजित केले जातात. यांची मुदत १ दिवसाची असते. कोणीही युवक अशा मेळाव्यासाठी सहभागी होऊ शकतो. यासाठी राज्य सरकार विद्यावेतन देत नाही. विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता स्वयंरोजगार करावा यासाठी युवक मेळाव्यात मार्गदर्शन केले जाते. सहकारी बँकांचे व्यवस्थापक राज्यवित्तीय महामंडळाचे

विभागीय अधिकारी, बोर्डाचे अधिकारी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जातात. इतर संस्थांचे या कामी सहकार्य घेतले जाते.

५.३.८ वार्षिक सभांना उपस्थिती -

बोर्डाच्या सहकारी प्रशिक्षण निदेशकांनी इतर सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित रहावे, त्या सभांचे अवलोकन करावे, सहकारी संस्थांचे कामकाज योग्यत-हेने चालते की नाही याची पहाणी करावी यासाठी हा कार्यक्रम राबविला जातो. बोर्डाच्या स्थापनेपासून सहकारी प्रशिक्षण निदेशक अशी उपस्थिती ठेवतात.

५.३.९ ग्राम सभा -

सर्व ग्रामस्थांच्या सहकार्याने गावातील ग्रामसभा पार पाडल्या जातात. गावातील अडीअडचणी समजावून घेऊन गावपातळीवरील सहकारी संस्था, ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित केला जातो. संबंधित गावाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सुविधांच्या अनुषंगाने चर्चा करण्यात येते. शासकीय यंत्रणेच्या वेगवेगळ्या सुविधांचा लाभ गावाला कसा घेता येईल याचा आराखडा तयार केला जातो. ग्रामसभेसाठी कालावधी एक दिवसाचा असतो. संख्येचे बंधन नाही. राज्य सरकार या कार्यक्रमासाठी विद्यावेतन देत नाही.

उपरोक्त कार्यक्रमा व्यतिरिक्त ग्रामीण विकास योजना, ध्वजदिन, शेतकी प्रदर्शन, सहकारी कायदे विषयक पुस्तकांची प्रसिध्दी, सांख्यिकीय माहिती प्रसिध्द करणे, समाज विकास योजना, सहकारी प्रचार वगैरे अभ्यास सहली, संपर्क सभा इ. शैक्षणिक कार्यक्रम सांगली जिल्हा सहकारी बोर्डाने गरजेप्रमाणे राबविले आहेत.

तसेच मागासवर्गीय कार्यकर्ता शिबिरे व परिषदा बोर्डाने १९८२ साली घेतल्या या सभांना अनुक्रमे २७ व ५०० अशी उपस्थिती होती.

सहकारी शिक्षण व प्रशिक्षणासाठी बोर्डाने व्याख्याने, चर्चा, परिसंवाद, प्रचार, प्रसार, प्रसिध्दी, दृकश्राव्य माध्यमे, स्लाईड शो इत्यादी पध्दतींचा वापर केला आहे.

समाजात विशेषत: ग्रामीण भागात सहकारी तत्वप्रणाली, सहकारी नेतृत्व आदींचा विकास व्हावा यासाठी प्रथमपासूनच प्रयत्न केले आहेत.

<u>सहकारी ध्वज</u> -

१९५२ साली आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या मार्गदर्शनाखाली १४ जुलैला ध्वजदिन साजरा केला गेला. भारतातही याचवेळी ध्वजदिन साजरा केला पण पुढे माजी पंतप्रधान कै. पं. नेहरूंच्या जन्मदिनी सहकार सप्ताहात ध्वजदिन साजरा केला जाऊ लागला.

या ध्वजाचे इंद्रधनुष्याप्रमाणे सात रंग आहेत. सुर्यप्रकाशात सात रंग असतात. सहकारी संस्थेचा कारभार सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ असावा ही त्यातील मूळ कल्पना आहे. सूर्यप्रकाशात जरी सात रंग असले तरी एकच रंग दिसतो. म्हणजे विविधतेतून एकता निर्माण व्हावी असेही अभिप्रेत आहे. सहकारी संस्थेस सर्व जाती, धर्म व आर्थिकदृष्टया दुर्बल घटक असतात त्या सर्वांमध्ये समानता निर्माण व्हावी हा मूळ हेतू ध्वजाचे सात रंग असण्यामागे आहे. या संबंधीचा तपशील खाली दिला आहे.

१) <u>तांबडा</u> - हा रंग मजूर व कामगार यांच्या श्रमजीवी संघटनेचे प्रतीक आहे. रॉशडेल यांचे प्रतिक म्हणून हा रंग झेंड्याच्या वरील बाजूस आहे.

२) <u>नारिंगी</u> - हा रंग मांडवलदार व सुखवस्तू व्यक्तींचे प्रतिक आहे. नारिंगी रंग तांबड्या रंगात मिसळून जावा, म्हणजेच मांडवलदार व्यक्तींनी श्रमजीवी वर्गाशी जवळीक साधावी, दोघांमध्ये समानता प्राप्त

व्हावी या हेतूने हा रंग एकमेकात मिसळावेत म्हणून शेजारी शेजारी आहेत.

३) पिवळा - हा रंग समाजातील दलित आणि दुर्बल निराधार लोकांचे प्रतिक समजला जातो. हा रंग दुर्बलांना संघटित करण्याचे प्रयत्न करतो असे मानले आहे.

४) हिरवा - हा रंग पिकाचे व धान्याचे म्हणजे हरित क्रांतीचे प्रतिक मानला जातो. सहकारातून हरित क्रांती यावी हेतू त्या मागे आहे.

५) निळा - हा रंग समता व बंधुभाव यांचे प्रतिक आहे. सर्वांना समान हक्क, जाती, धर्म, प्रतिष्ठा, श्रीमंती, भेदाभेद नष्ट करून समानता प्रस्थापित करणे हे या रंगाचे सुचित आहे

६) पांढरा - हा रंग स्वच्छता, शुभ्रता व मांगल्याचे प्रतिक आहे. सहकारी संस्थेचा कारभार स्वच्छ असावा असाही दृष्टिकोन या रंगामागे आहे.

७) जांभळा - हा रंग काटकसरीचे प्रतिक मानला जातो. भविष्यकाळातील अधिक महत्वाच्या गरजा भागवण्यासाठी बचतीची आवश्यकता असते. बचतीमुळे स्वावलंबन वाढते. काटकसर हा सहकाराचा प्रारंभीचा मुलाधार आहे.

सूर्य किरणांचा प्रभाव सर्व जगावर पडतो. सूर्यप्रकाशाची उपयुक्तता सर्वज्ञात आहे. सहकारी चळवळीची उपयुक्तता अशीच आहे असे या ध्वजाने (सप्तरंगांनी)सुचित करावयाचे आहे.

५.४ सभासद सचिवांच्या व सहकार प्रशिक्षण
निदेशकांच्या अडचणी :

राज्य सहकारी संघाने ठरवून दिलेले शैक्षणिक कार्यक्रम राबवताना त्या दृष्टीने कामकाज करीत असताना बोर्डातील उपरोक्त कर्मचाऱ्यांना काही अडचणी येतात त्या खालीलप्रमाणे आहेत

१) बोर्डाच्या कामकाजामध्ये ५० टक्के कामकाज शैक्षणिक कार्यक्रम राबवण्यासाठी व ५० टक्के कामकाज शिक्षण निधीच्या वसुलीसाठी असते. वसुलीसाठी फिरती करावी लागते. महिन्यातील २० दिवस या कामी खर्ची होतात. त्यामुळे शैक्षणिक कार्यक्रम राबवण्यासाठी वेळ अपुरा पडतो.

२) शिक्षण निधीच्या वसुलीसाठी गटसचिवांच्या बैठका एका तालुक्यात महिन्यातून दोन वेळा असतात. शिवाय अर्बन बँका, साखर कारखाने, सूत गिरण्या यांना प्रत्यक्ष भेटी देऊन शिक्षण निधी वसूल करावा लागतो.

३) महाराष्ट्रातील सर्व जिल्हा सहकारी बोर्डातील सेवकांची अशी मागणी आहे की शिक्षण फंडाच्या वसुलीची जबाबदारी पूर्णपणे शासनाने स्वीकारावी अथवा त्यासाठी एक वेगळी व्यवस्था करावी.

४) शिक्षण फंड वेळेवर वसूल झाला तरच वेतन वेळेवर मिळते म्हणून शिक्षण फंडाकडे अधिक लक्ष द्यावे लागते.

५) प्रयत्न करूनही सहकारी चळवळीबद्दलची आस्था पूर्वीप्रमाणे वाढत नाही. त्यामुळे शैक्षणिक कार्यक्रम राबवताना लोकांचा सहभाग पुरेशा प्रमाणात सर्वच ठिकाणी मिळतोच असे नाही.

या बाबतीत एका कर्मचाऱ्याने काढलेले उद्गार मार्मिक आहेत. ते म्हणतात," आम्ही घोड्याला पाण्यापर्यन्त नेऊ शकतो पण पाणी प्यायचे की नाही हे घोड्याने ठरवायचे आहे."

६) ज्या भागात सहकारी चळवळीचा प्रसार झाला आहे, त्या भागातील लोक आस्थेवाईकपणे कार्यक्रमास येतात. पण भागास भागातील लोक येत नाहीत. म्हणून शासनाने पदाधिका-यांसाठी संचालक मंडळावर निवडून येताना शिक्षणाची अट घालावी.

७) शैक्षणिक कार्यक्रमात सहभागी होणा-यांना विद्यावेतन वाढवून मिळावे म्हणजे सहभाग वाढेल.

५.५ <u>उपसंहार</u> :

सहकारी शिक्षणाचा प्रसार व्हावा या हेतूने राज्य सहकारी संघाच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सहकारी बोर्डाने केलेले प्रयत्न सर्वकंष आहेत. विशेषत: ग्रामीण भागाचा कायापालट घडवून आणण्यासाठी सहकारी शिक्षण ग्रामीण स्तरापर्यन्त कसे दिले जाते याचे चित्रच नजरेसमोर उभे रहाते. ज्ञान हे अमर्याद आहे या उक्तीप्रमाणे अमर्याद ज्ञानाच्या कक्षा आपल्या कार्यक्षेत्रात सीमित करण्याचा प्रयत्न जिल्हा सहकारी बोर्डाने केला आहे.

सहकारी संस्था ज्या सभासदांच्या आहेत त्या सभासदांना शिक्षित करण्यासाठी केलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांना प्रतिसाद चांगला मिळतो आहे असे सारणीवरून दिसून येते.

सहकारी शिक्षण देण्यासाठी जिल्हा सहकारी बोर्डाची स्थापना होऊन ४० वर्षे झाली पण अजून कार्यक्रमाची व्याप्ती पहाता त्याचा प्रसार व्हायला हवा.

सहकारी क्षेत्रात काम करणा-या सभासदाने सहकार ही सरकार पुरस्कृत यंत्रणा आहे असे न मानता ती एक जीवनपध्दती आहे म्हणून सहकाराचा स्वीकार करायला हवा.

सहकारी परिषद, सहकार दिन, सहकारी सप्ताह, सहकारी वाङ्.मय, पंच कमिटी वर्ग, सचिव उजळणी वर्ग, वार्षिक सभांना उपस्थिती, सहकारी वाङ्.मय इ. कार्यक्रम बोर्डाने स्थापनेपासून १९९० पर्यन्त चांगल्या प्रकारे राबवलेले दिसून येते.

पदाधिकारी वर्गाची सुरूवात १९८५ नंतरच झालेली दिसते. सेवक अल्पमुदत वर्ग १९७१ नंतर तर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, परिसंवाद हे कार्यक्रम गेल्या दशकातील आहेत.

महिलांमध्ये सहकारी चळवळी विषयी जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने उशीरा प्रयत्न चालू केले आहेत. वस्तुत: प्रामाणिकपणा, सचोटी, चिकाटी हे सहकाराच्या वाढीसाठी आवश्यक असणारे गुण स्त्रियांच्या अंगी तुलनेने जास्त असतात. त्याचा वापर सुयोग्य त-हेने व्हायला हवा. सहकारी दुग्ध व्यवसाय, ग्राहक सहकारी संस्था पूर्णपणे स्त्रियांनी चालवण्यासारखी क्षेत्रे आहेत. तिथे स्त्रियांना अधिक वाव आहे. मागे उल्लेखल्याप्रमाणे स्त्रियांचा सहकारातील सहभाग एकूण स्त्रियांची संख्या पहाता कमी आहे. तो वाढवावयास हवा.

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाची शैक्षणिक प्रगती दोन टप्प्यांमध्ये झालेली दिसून येते. १९७१ पूर्वी व नंतर १९७१ नंतर सहकारी बोर्डाने व्यापक रितीने शैक्षणिक कार्यक्रम राबवलेले दिसतात.

सहकारी पाणी पुरवठा संस्था, पशुपालन, सहकारी दुग्धव्यवसाय, सहकारी पतसंस्था, सेवा सहकारी संस्था यावर घेतल्या गेलेल्या शिबिरामुळे ग्रामीण भागातील अडीअडचणींचे निवारण होण्यास मदत झाली आहे.

नागरी व अर्धनागरी भागात अर्बन बँका व जिल्हा मध्यवर्ती बँका यामधील सहकारी प्रशिक्षित पदाधिका-यांमुळे सहकारी संस्थांना होणा-या कर्ज पुरवठ्यातील अडथळे कमी होण्यास मदत झाली आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

बोर्डातील पदाधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यतत्पर व सहकारी प्रवृत्तीचा आहे असे जाणवते. तसेच विषयासंबंधी सखोल ज्ञान व ते देण्याची तळमळ त्यांच्या वागणुकीवरून दिसून येते.

सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे लाभार्थी यांनी स्वत:ला मिळालेल्या ज्ञानाचा वापर कसा करावयाचा हे डोळसपणे ठरविले पाहिजे.

—x—x—x—x—x—

सारणी क्र. ५.१

सभासद सचिवांचा कार्यक्रम १९५२ ते १९९०

| अनु. | शैक्षणिक कार्यक्रमाचे नाव | १९५२ |  | १९५३ |  | १९५४ |  | १९५५ |  | १९५६ |  | १९५७ |  | १९५८ |  | १९५९ |  | १९६० |  | १९६१ |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग |
| १. | परिषद | ५ | ७०० | १ | ३०० | १ | उ.ना. | १ | २५० | १ | २५० | १ | उ.ना. | १ | उ.ना. | ३ | ८५० | १ | उ.ना. | १ | उ.ना. |
| २. | पदाधिकारी वर्ग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३. | सेवक अल्पमुदत वर्ग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४. | वक्तृत्व स्पर्धा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५. | निबंध स्पर्धा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ६. | परिसंवाद | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ७. | सहकार दिन | १ | ७५ | १ | २५० | १ | ७५ | ४ | ३७० | १ | २५० | १ | उ.ना. | - | - | - | - | - | - | - | - |
| ८. | सहकार सप्ताह (सुवर्ण महोत्सव) | - | - | - | - | ७ | २२५ | - | - | - | - | १ | उ.ना. | - | - | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. |
| ९. | शैक्षणिक प्रचार, वाङ्.मय, प्रसिध्दी |  |  |  |  |  |  |  |  |  |  | वाङ्.मय प्रसिध्दी |  |  |  | सहकारी जगत |  | बॉंबे कोपारेटीव्ह |  |  |  |

सारणी क्र. ५.१ (पुढे चालू....)

| अनु. | शैक्षणिक कार्यक्रमाचे नाव | १९६२ संस्था | १९६२ सहभाग | १९६३ संस्था | १९६३ सहभाग | १९६४ संस्था | १९६४ सहभाग | १९६५ संस्था | १९६५ सहभाग | १९६६ संस्था | १९६६ सहभाग | १९६७ संस्था | १९६७ सहभाग | १९६८ संस्था | १९६८ सहभाग | १९६९ संस्था | १९६९ सहभाग | १९७० संस्था | १९७० सहभाग | १९७१ संस्था | १९७१ सहभाग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | परिषद | १ | १२५ | १ | ६०० | १ | ६०० | १ | - | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | १००० | १ | २००० |
| २. | पदाधिकारी वर्ग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३. | सेवक अल्पमुदत वर्ग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | ५० |
| ४. | वक्तृत्व स्पर्धा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५. | निबंध स्पर्धा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ६. | परिसंवाद | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ७. | सहकार दिन | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उनि | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. |
| ८. | सहकार सप्ताह | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - |
| ९. | शैक्षणिक प्रचार, वाङ्मय, प्रसिध्दी | सहकारी मुद्रणालय सांगली सहकार | | - | - | - | - | - | - | - | - | सहकारी जगत | | - | - | - | - | सांख्यकीय प्रसिध्दी | | - | - |
| | (प्रशिक्षण केंद्राचे कार्यक्रम) | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १०. | सहकारी डिप्लोमा | | १७२ २६ | - | - | - | २०२ १४८ | - | १०५ | - | ७६ | - | २६१ | - | १५७ | २ | [illegible] | २ | [illegible] | २ | [illegible] |
| ११. | सहकारी मेळावे | १ | उ.ना. | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

सारणी क्र. ५.१ (पुढे चालू...)

| अनु. | शैक्षणिक कार्यक्रमाचे नाव | १९७२ | | १९७३ | | १९७४ | | १९७५ | | १९७६ | | १९७७ | | १९७८ | | १९७९ | | १९८० | | १९८१ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग |
| १. | परिषद | १ | १५०० | १ | उ.ना. | १ | १५०० | १ | उ.ना. | - | - | - | - | - | १ | १ | उ.ना. | १ | ४०० | - | - |
| २. | पदाधिकारी वर्ग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३. | सेवक अल्पमुदत वर्ग | ३ | ९६ | - | - | २ | ३४ | २ | २८ | २ | ६५ | १ | उ.ना. | - | - | - | - | २ | ६२ | १ | १५ |
| ४. | वक्तृत्व स्पर्धा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५. | निबंध स्पर्धा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १९ |
| ६. | परिसंवाद | - | - | - | - | १ | उ.ना. | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | उ.ना. | १ | ७५ |
| ७. | सहकार दिन | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. |
| ८. | सहकार सप्ताह | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - |
| ९. | शैक्षणिक कार्यक्रम प्रचार, वाङ्मय, प्रसिध्दी | सत्यवादी, राष्ट्रशक्ती, नवसंदेश | | - | - | - | - | - | - | सहकारी महाराष्ट्र, सहकारी जगत | | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १०. | (प्रशिक्षण केंद्राचे कार्यक्रम) सहकारी डिप्लोमा | | ९२५ | २ | | २ | १६२ | २ | ५३८ | २ | २९६ | २ | २८ | २ | उ.ना. | | | | | | |
| ११. | सहकारी मेळावे | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

सारणी क्र. ५.१ (पुढे चालू....)

| अनु. | शैक्षणिक कार्यक्रमाचे नाव | १९८२ | | १९८३ | | १९८४ | | १९८५ | | १९८६ | | १९८७ | | १९८८ | | १९८९ | | १९९० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | सहभाग | संस्था | सहभाग | संस्था | सहभाग | संस्था | सहभाग | संस्था | सहभाग | संस्था | सहभाग | संस्था | सहभाग | संस्था | सहभाग | संस्था | सहभाग |
| १. | परिषद | १ | ५०० | १ | २३० | १ | ५०० | १ | ५०० | १ | ५०० | १ | ५५ | १ | ६० | १ | ५०० | १ | ५०० |
| २. | पदाधिकारी वर्ग | १ | २६ | - | - | - | - | १ | १० | १ | १० | १ | २५ | १ | ३२ | १ | १६ | १ | २६ |
| ३. | सेवक अल्पमुदत वर्ग | १ | २८ | - | - | १ | २३ | १ | २२ | १ | २२ | १ | १९ | १ | १६ | १ | २२ | १ | ३८ |
| ४. | वक्तृत्व स्पर्धा | १ | ९ | - | - | - | - | १ | १६ | - | - | १ | १२ | १ | ८ | १ | १० | १ | ९ |
| ५. | निबंध स्पर्धा | १ | १६ | १ | १९ | १ | १० | १ | ११ | १ | १६ | १ | १९ | १ | १३ | १ | २८ | १ | १८ |
| ६. | परिसंवाद | १ | १००० | १ | २२५ | १ | ११३ | - | - | - | - | - | - | - | - | १ | १०७ प्रति | १ | ५१ प्रति |
| ७. | सहकार दिन | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. | १ | उ.ना. |
| ८. | सहकार सप्ताह | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - | १ | - |
| ९. | शैक्षणिक प्रचार वाड्.मय प्रसिध्दी | | | | १३८ वर्गणीदार | | | | | | | | | | | | | | |
| १०. | सहकारी डिप्लोमा | २ | १९८० | २ | २०४० | २ | २११० | २ | २३२७ | २ | ७४ | २ | ७४ | २ | २२७ | २ | ११६ | २ | १८२ २२७ |
| ११. | सहकारी मेळावे | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १२. | महिला सहकारी संस्था फेडरेशन | | | | | १ | उ.ना. | | | | | | | | | | | | |

टीप : उ.ना. - उपलब्ध नाही

आधार : सांगली जिल्हा सहकारी बोर्ड - वार्षिक अहवाल १९५२ ते १९९० वरून संकलित

सारणी क्र. ५.२

सहकार प्रशिक्षण निदेशकांचा कार्यक्रम - १९५२ ते १९९०

| अनु. | कार्यक्रमाचे नाव | १९५२ | | १९५३ | | १९५४ | | १९५५ | | १९५६ | | १९५७ | | १९५८ | | १९५९ | | १९६० | | १९६१ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग |
| १) | सहकारी कार्यकर्ता शिबिरे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | ४५ |
| २) | सहकारी कार्यकर्ता मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३) | महिला सहकारी शिबिरे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४) | महिला सहकारी मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५) | पंच कमिटी वर्ग | ६ | २१८६ | ५ | १३६७ | ६ | ९०१ | १३ | १४० | २७ | ६१४ | ५ | ५० | ५ | २२ | ९८ | १३६७ | ७८ | ११०९ | ४६ | १८८५ |
| ६) | सचिव उजळणी वर्ग | २ | ९५ | २ | ५५ | ३ | ६९ | २ | ८४ | ३ | ९० | २ | ८५ | ५ | १४६ | ४ | १०५ | ३ | ११८ | ५ | १८० |
| ७) | युवक शिबिरे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | उ.ना. | १ | उ.ना. | - | - |
| ८) | शालेय व्याख्याने | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ९) | वार्षिक सभांना उपस्थिती | १ | २०८ | १ | १४६ | १ | ८९ | १ | १४० | १ | ११६ | १ | १०६ | १ | १८२ | १ | १३३ | १ | १४० | १ | २२१ |
| १०) | युवक सहकारी मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ११) | ग्राम सभा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

सारणी क्र. ५.२ (पुढे चालू...)

| अनु. | कार्यक्रमाचे नाव | १९६२ | | १९६३ | | १९६४ | | १९६५ | | १९६६ | | १९६७ | | १९६८ | | १९६९ | | १९७० | | १९७१ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग |
| १) | सहकारी कार्यकर्ता शिबिरे | १ | ३९ | - | - | - | - | ५ | उ.ना. | ६ | उ.ना. | - | - | - | - | - | - | १० | ४६६ | १० | ५४१ |
| २) | सहकारी कार्यकर्ता मेळावे | - | - | २ | उ.ना. | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३) | महिला सहकारी शिबिरे | १ | ३९ | - | - | ६ | उ.ना. | ५ | उ.ना. | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४) | महिला सहकारी मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५) | पंच कमिटी वर्ग | ४१ | २७२४ | ४७ | २८०३ | २४ | २२३० | ३४ | १०१२ | ९ | २०८ | ३ | ११७ | ६ | ८३० | ४३ | ६६० | ३६ | ८३४ | ४९ | १२९६ |
| ६) | सचिव उजळणी वर्ग | ५ | १९४ | ४ | ७८ | ४ | ११४ | ४ | १३१ | २ | ३७ | ३ | ८८ | ४ | ११५ | ३ | ५४ | ३ | ७४ | ३ | ९७ |
| ७) | युवक शिबिरे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ८) | शालेय व्याख्याने | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ९) | वार्षिक सभांना उपस्थिती | १ | २३७ | १ | १०७ | १ | २२५ | १ | १३८ | १ | ७९ | १ | ८९ | १ | १४० | १ | ७० | १ | ८७ | १ | १११ |
| १०) | युवक सहकारी मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ११) | ग्राम सभा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

सारणी क्र. ५.२ (पुढे चालू...)

| अनु. | कार्यक्रमाचे नाव | १९७२ | | १९७३ | | १९७४ | | १९७५ | | १९७६ | | १९७७ | | १९७८ | | १९७९ | | १९८० | | १९८१ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग |
| १) | सहकारी कार्यकर्ता शिबिरे | ६ | २५१ | ४ | १०९ | ४ | १४५ | ५ | १४३ | २ | उ.ना. | १ | ५० | ५ | १७९ | ३ | १०६ | ६ | ३०५ | ५ | २३५ |
| २) | सहकारी कार्यकर्ता मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३) | महिला सहकारी शिबिरे | - | - | १ | ८० | - | - | १ | ४४ | - | - | - | - | - | - | - | - | २ | उ.ना. | २ | उ.ना. |
| ४) | महिला सहकारी मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५) | पंच कमिटी वर्ग | ४५ | १३६ | ५० | ११९० | ३८ | ८५७ | ४७ | ११९८ | ६६ | १९०० | ६७ | १६९८ | १ | २५ | ५५ | १२१४ | ३३ | ७०२ | ४१ | ७८० |
| ६) | सचिव उजळणी वर्ग | ३ | ८५ | ३ | ४८ | २ | ३० | २ | २८ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ७) | युवक शिबिरे | - | - | १ | २७ | - | - | २ | ६३ | १ | ३० | १ | ३० | २ | ८० | ३ | १७६ | २ | १०० | २ | १३६ |
| ८) | शालेय व्याख्याने | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २७ | - | ३८ | १७३८ | ३३ | २०८२ | ३६ | १४२४ |
| ९) | वार्षिक सभांना उपस्थिती | १ | ९७ | १ | ६८ | १ | ३७ | १ | २८ | - | - | - | - | - | - | - | - | १ | ४०० | १ | - |
| १०) | युवक सहकारी मेळावे | - | - | १ | ११ | १ | उ.ना. | ५ | ३२२ | २ | उ.ना. | ३ | उ.ना. | ५ | ४८३ | ४ | ४४३ | १४ | ११५९ | ११ | ९६१ |
| ११) | ग्राम सभा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

सारणी क्र. ५.२ (पुढे चालू....)

| अनु. | कार्यक्रमाचे नाव | १९८२ | | १९८३ | | १९८४ | | १९८५ | | १९८६ | | १९८७ | | १९८८ | | १९८९ | | १९९० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग | संख्या | सहभाग |
| १) | सहकारी कार्यकर्ता शिबिरे | ६ | २६७ | ४ | २०४ | ६ | २६२ | ६ | २४६ | ३ | ८४ | ६ | १८७ | ७ | २२८ | ८ | २५७ | १३ | ४५६ |
| २) | सहकारी कार्यकर्ता मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | २१ | १८४३ | ३१ | २४५२ | २५ | २२१८ | २८ | ३७४१ | २२ | २४५१ |
| ३) | महिला सहकारी शिबिरे | २ | उ.ना. | २ | उ.ना. | २ | उ.ना. | २ | उ.ना. | २ | ७९ | २ | ९१ | - | - | १ | उ.ना. | ३ | १२१ |
| ४) | महिला सहकारी मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | - | - | ३ | २७७ | - | - | १ | उ.ना. | २ | १९५ |
| ५) | पंच कमिटी वर्ग | ३५ | ६१३ | ३० | ५५० | ३६ | ७५२ | ३० | ७६४ | ३० | ७०२ | १४ | २९९ | १५ | ३२४ | १५ | ३४७ | १५ | ३३ |
| ६) | सचिव उजळणी वर्ग | ४ | उ.ना. | ५ | उ.ना. | ५ | उ.ना. | ६ | उ.ना. | ६ | उ.ना. | - | - | - | - | - | - | - | - |
| ७) | युवक शिबिरे | २ | १०९ | २ | १४८ | ३ | १७२ | ३ | १४५ | ६ | ३४५ | ६ | ३६१ | ६ | १३६ | ३ | ११८ | ३ | १४३ |
| ८) | शालेय व्याख्याने | ३२ | १४४१ | ३६ | १५०८ | ४६ | २२५४ | ४४ | २७७४ | - | - | ४३ | २४९९ | ४५ | २४९८ | ३० | ३८०२ | ३० | १७७६ |
| ९) | वार्षिक सभांना १०) उपस्थिती | - | - | - | - | १५ | ५० | २ | ६११ | १ | ९१३ | - | - | - | - | १ | ६५२८ | १ | १४९३ |
| १०) | युवक सहकार मेळावे | १३ | १००२ | १२ | ९५९ | २५ | २२२६ | २२ | १९२९ | ३० | १९२९ | ६ | ११९८ | ६ | ९०५ | ६ | ११८८ | ३ | ९०० |
| ११) | ग्राम सभा | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १५ | ७२१ |
| १२) | शेतकरी मेळावे | - | - | - | - | - | - | - | - | ७ | उ.ना. | ६ | उ.ना. | ६ | उ.ना. | - | - | - | - |
| १३) | दुर्बल घटकांकरिता कार्यक्रम | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

टीपा : १) उ.ना. = उपलब्ध नाही

आधार : सांगली जिल्हा सहकारी बोर्ड, वार्षिक अहवाल, १९५१ ते १९९० वरून संकलित.